आ.अ.वि.वि/कॉलेज/167/2011
**06 जुलै,2011**

**<u>परिपत्रक क - 2</u>** **(फक्त रायगड जिल्हयाकरिता)**

प्रति,
प्राचार्य,
कला, वाणिज्य व शास्त्र महाविदयालये,
शिक्षणशास्त्र महाविदयालये व संस्था,
रायगड

**विषय ः <u>विस्तार कार्यातील शिक्षक आणि विदयार्थी व्यवस्थापकांसाठी प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रम</u>**

महोदय,

सालाबादाप्रमाणे याही वर्षी विस्तार कार्यातील शिक्षक व विदयार्थी व्यवस्थापकांसाठी प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये **19** जुलै ते **31** जुलै, **2011** या दरम्यान ठरविण्यात आले आहेत.

यापैकी एक प्रशिक्षण कार्यक्रम रायगड जिल्हयातील **माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, माणगाव, जिल्हा रायगड - 402 104** येथे **<u>मंगळवार दि. 19 जुलै, 2011 रोजी 10.00 ते 3.00</u>** या वेळेत ठरविण्यात आला आहे.

तरी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आपल्या महाविद्याल्यातील **1** ते **2** शिक्षक व **2** विदयार्थी व्यवस्थापक पाठवावेत ही विनंती.

**प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रमात विस्तार कार्यशिक्षक व विदयार्थी व्यवस्थापकांचा सहभाग असल्याशिवाय महाविद्यालयांना आपल्या महाविद्यालयामध्ये विस्तार कार्य उपक्रम राबविण्याची अनुमती मिळणार नाही याची नोंद घ्यावी.**

या पत्रासोबत विस्तारकार्यात सहभागी होण्यासाठी विदयार्थी व्यवस्थापकांसाठी नोंदणी अर्ज पाठवित आहोत. सर्व विस्तार कार्य विदयार्थी व्यवस्थापकांनी हा अर्ज पूर्ण भरावा व प्राचार्यांच्या सही व शिक्क्यासह **<u>16 जुलै,2011</u>** पुर्वी विभागाकडे सूपूर्द करावा. ही विनंती. धन्यवाद !

आपला विश्वासू

**डॉ. दिलीप शं. पाटील**
**प्राध्यापक व संचालक**